# नारळीकर आणि नारळीकर!

**डॉ. जयंत नारळीकर यांची मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली. त्यानिमित्त त्यांचे कोल्हापूरसोबत असलेले नाते आणि त्यांच्या कुटुंबाविषयी**

**-उदय कुलकर्णी**




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या 2015 मध्ये झालेल्या दीक्षान्त सोहळ्याला डॉ. जयंत नारळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांना डी. लिट. पदवी प्रदान करताना कुलगुरू डॉ. एन. जे. पवार. यावेळी (डावीकडून) परीक्षा नियंत्रक महेश काकडे, डॉ. नारळीकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक भोईटे, कुलसचिव डॉ. डी. व्ही. मुळे.**

पृथ्वीशिवाय विश्वात अन्यत्र कोठे जीवसृष्टी अस्तित्वात आहे का, हा शेकडो वर्षांपासून माणसाला पडलेला प्रश्न. काही वर्षांपूर्वी 'केप्लर' या अवकाशातील टेलिस्कोपने जी माहिती पुरविली त्यानुसार पृथ्वीपासून १४०० प्रकाश वर्षे अंतरावर पृथ्वीसारखाच एक ग्रह आहे. तो पृथ्वी सूर्याभोवती फिरते त्याप्रमाणे त्याच्याजवळील ताऱ्याच्या कक्षेत भ्रमण करतो. आणि विशेष म्हणजे तो ग्रह तेथील ताऱ्यापासून सूर्य-पृथ्वीदरम्यानच्या अंतराइतक्याच अंतरावर आहे. ही माहिती जगासमोर आली आणि त्या ग्रहावर जीवसृष्टीला पूरक वातावरण असू शकते, अशी चर्चा बळावली. खरे तर डॉ. जयंत नारळीकर यांच्यासारखे शास्त्रज्ञ कितीतरी वर्षांपासून विश्वामध्ये एखाद-दुसऱ्या नव्हे तर अनेक ठिकाणी जीवसृष्टी असण्याची शक्यता वर्तवत आले आहेत. २००२ च्या दरम्यान डॉ. नारळीकरांनी पृथ्वीपासून ४१ किलोमीटर उंचीवर आपल्याला काही मायक्रोब्स आढळल्याचा दावा केला होता. मायक्रोब्स म्हणजे सूक्ष्मजीव किंवा जीवाणू. पृथ्वीवरूनच हे जीवाणू इतक्या उंचीपर्यंत गेले असण्याची शक्यता कमी आहे. अशा स्थितीत त्या जीवाणूंच्या अभ्यासातून परग्रहावरील जीवसृष्टी शोधण्याच्या दृष्टीने किंवा जीवसृष्टीच्या उद्भवाच्या दृष्टीने काही महत्त्वाची माहिती मिळू शकेल, असे डॉ. नारळीकर, एम. सी. विक्रमसिंघे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना वाटत होते.

डॉ. नारळीकरांनी विश्वउत्पत्ती शास्त्र आणि खगोल विज्ञानासाठी वैज्ञानिक म्हणून जे योगदान दिले, त्याची दखल घेऊन त्यांना 'महाराष्ट्र भूषण', 'राष्ट्रभूषण', 'पद्मभूषण', 'पद्मविभूषण' अशा राष्ट्रीय पातळीवरच्या अनेक सन्मानांनी गौरवण्यात आले आहे. डॉ. नारळीकरांनी विज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रचार, प्रसारासाठी स्वतः लेखणी हातात घेतली. देशविदेशात सर्वसामान्य माणसांसाठी सोप्या भाषेत व्याख्यानेही दिली. त्यांनी इंग्रजी तसेच मराठीत विज्ञान कथाही लिहिल्या. त्यांच्या या प्रयत्नांसाठी १९९६ मध्ये ते जसे 'युनेस्को'च्या 'कलिंगा' ॲवॉर्डचे मानकरी ठरले, त्याचप्रमाणे 'साहित्य अकादमी'नेही 'चार नगरातले माझे विश्व' या मराठीत लिहिलेल्या आत्मकथेसाठी त्यांना २०१४ मध्ये साहित्य अकादमी पुरस्काराने गौरवले.

आत्मकथा लिहिण्यापूर्वी डॉ. नारळीकरांना आपले मूळ गाव कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यात असल्याची माहिती मिळाली होती. ते आवर्जून गावी जाऊन आले. डॉ. जयंत नारळीकर व त्यांचे भाऊ डॉ. अनंत नारळीकर दोघांनीही वैज्ञानिक जगतात लक्षवेधी कर्तृत्व गाजवले हे खरे आणि या दोघांनीही केंब्रिजमध्ये शिक्षण घेतले हेही खरे, पण नव्या पिढीतील खूप कमी जणांना माहिती आहे, की त्यांचे वडील विष्णू वासुदेव नारळीकर हेही केंब्रिजचे विद्यार्थी होते आणि तेही रँग्लर झालेले गणिती होते.

कोल्हापुरातील महाद्वार रोडवर बिनखांबी गणेश मंदिराकडून महालक्ष्मी मंदिराकडे जाताना आजही उजव्या हाताला एका इमारतीवर 'नारळीकर भवन' नावाची पाटी दिसते. या नारळीकर भवनच्या ठिकाणीच पूर्वी वासुदेव शास्त्री नारळीकरांचा वाडा होता. वासुदेव शास्त्रींचा 'भागवत महापुराण' रसाळवाणीने सांगण्यात हातखंडा होता. अनेक दुर्मीळ पोथ्यांचा संग्रहही त्यांच्याकडे होता. या वासुदेव शास्त्रींचे सगळ्यात लहान चिरंजीव म्हणजे विष्णू नारळीकर. २६ सप्टेंबर १९०८ चा त्यांचा जन्म. कोल्हापुरातील विद्यापीठ हायस्कूल आणि छत्रपती राजाराम हायस्कूलमध्ये त्यांचे शालेय शिक्षण झाले. महाविद्यालयीन शिक्षण मुंबईत घेतले. त्यानंतर इंग्लंडमध्ये जाऊन केंब्रिज विद्यापीठातून रँग्लर झाले. ते भारतात परतले तेव्हा कोल्हापुरात रेल्वे स्थानकावर त्यांचे जल्लोषी स्वागत केले होते. कोल्हापूर नगरपालिकेने त्यांना मानपत्र दिले. विशेष म्हणजे त्यानंतर ३० वर्षांनी डॉ. जयंत नारळीकर यांनाही मानपत्र देऊन गौरविले.

वि. वा. नारळीकर यांचा विवाह कोल्हापुरातीलच सुमती हुजूरबाजार यांच्याशी झाला. सुमती नारळीकर संस्कृत व गणित यांचा उत्तम अभ्यास असलेल्या. पंडित मदनमोहन मालवीय यांनी बनारस हिंदू विश्व विद्यालयात रँग्लर नारळीकर यांना गणित विभागाचे प्रमुख म्हणून वयाच्या २४ व्या वर्षीच नेमणूक दिली होती. जयंत नारळीकरांचा जन्म कोल्हापुरात झाला तरी त्यांचे बालपण गेले ते बनारसमध्ये.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, रँग्लर र. पु. परांजपे आदी नामवंत, विद्वान, कलाकार, साहित्यिकांचे बनारसमध्ये नारळीकरांच्या घरी येणे, जाणे असे. अशा अनेक विद्वानांचा सहवास लहानपणीच जयंत व अनंत नारळीकर यांना लाभला.

बनारस विद्यापीठात काम करताना डॉ. राधाकृष्णन यांच्याशी झालेली रँग्लर नारळीकरांची मैत्री पुढे अखेरपर्यंत कायम राहिली. कोल्हापुरातील विद्यापीठ हायस्कूलच्या सुवर्णमहोत्सवी समारंभासाठी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी प्रमुख पाहुणे म्हणून कोल्हापुरात यावे यासाठी रँग्लर नारळीकरांनी उपराष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांच्याकडे शब्द टाकला आणि डॉ. राधाकृष्णन यांनीही ते निमंत्रण स्वीकारून आवर्जून कोल्हापूरला आले.

जयंत नारळीकरांमध्ये जी गुणवैशिष्ट्ये आढळतात त्यांचा पाया त्यांच्या रँग्लर नारळीकर व सुमती नारळीकर या आई-वडिलांकडून झालेल्या जडणघडणीत दडला आहे. कर्तव्याशी कधीही प्रतारणा करायची नाही, हाही याच गुणवैशिष्ट्यांचा एक भाग. त्यामुळेच १९९१ मध्ये रँग्लर नारळीकर यांचे पुण्यात निधन झाले. त्यानंतर त्याच दिवशी काही तासांत डॉ. जयंत नारळीकर 'आयुका'मध्ये आपल्या दैनंदिन कामावर रुजू झाले. डॉ. जयंत नारळीकरांसारख्या माणसाने मराठी साहित्यात विज्ञानकथांच्या स्वरूपात आणि आत्मकथेच्या स्वरूपातही जी मोलाची भर घातली आहे, तिचा योग्य सन्मान त्यांच्या संमेलनाध्यक्षपदी एकमताने निवडीमुळे झाला आहे.

### नारळीकरांची वाटचाल

- १९५७ मध्ये बनारस हिंदू विश्व विद्यालयातून बॅचलर ऑफ सायन्स
- १९५९ मध्ये केंब्रिज विद्यापीठातून गणित विषयातील पदवी, सीनियर रँग्लर अशी ओळख
- १९६० मध्ये खगोल विज्ञानातील अभ्यासासाठी 'टायसन' मेडल जिंकले
- १९६२ मध्ये ते 'स्मिथ्स' पुरस्काराचे मानकरी
- १९६३ मध्ये पीएच.डी. संपादन, केंब्रिजच्याच किंग्ज कॉलेजमधून 'बेरी रामसे फेलो' म्हणून खगोल विज्ञान आणि खगोल भौतिकी या विषयात मास्टर्स डिग्री
- १९७२ पर्यंत त्याच महाविद्यालयात अध्यापन
- फ्रेड हॉएल यांच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ थिअरॉटिकल ॲस्ट्रॉनॉमी' संस्थेत संस्थापक सदस्य म्हणून सहा वर्षे योगदान
- १९७२ मध्ये मुंबईतील 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च' या संस्थेत प्रोफेसर पद, 'थिअरॉटिकल ॲस्ट्रॉफिजिक्स ग्रुप'चे प्रमुख म्हणून कार्यरत.
- १९८८ मध्ये पुण्यात 'आयुका'ची स्थापना, जबाबदारी स्वीकारली.

# परदेशी विद्यार्थ्यांनी मानले विद्यापीठाचे आभार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षणासाठी दाखल होत असताना मनात अनेक संमिश्र भावना होत्या. विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसरात जीव गुंतला. चांगली माणस मिळाल्याने शिक्षणाचा कालावधी कधी पूर्ण झाला समजलेच नाही. येथील आपुलकीचे बंध अविस्मरणीय आहेत, अशा शब्दांत शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागांतून पदव्युत्तर शिक्षण घेऊन बाहेर पडत असलेल्या परदेशी विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

- शिक्षण पूर्ण करून जाणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांना निरोप
- कोरोना संकटात काळजी घेतल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागांत सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात विविध देशांतील विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतला होता. या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आणि नव्या विद्यार्थ्यांचे स्वागत अशा संयुक्त कार्यक्रमात त्यांनी भावना व्यक्त केल्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थित होती.

विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांसोबत दिवाळीसह विविध सण साजरे केल्याच्या आठवणींबरोबरच कोरोना कालात स्वतःच्या घरापासून दूर असलेल्या आम्हा विद्यार्थ्यांची आपुलकीच्या काळजी घेतल्याबद्दल शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक यांचे आभार मानले. इंटरनॅशनल अफेअर्स सेलचे संचालक प्रा. ए. व्ही. घुले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. जी. एस. राशीनकर यांनी या विद्यार्थ्यांची माजी विद्यार्थी म्हणून नोंदणीकृत



करण्याबाबतची कार्यवाही केली. डॉ. जे. बी. यादव यांनी आभार मानले. यावेळी आयक्यूएसी संचालक प्रा. एम. एस. देशमुख, प्रा. एस. एस. महाजन, प्रा. के. डी. सोनवणे, प्रा. जी. एस. राशीनकर, प्रा. ए. एम. गुरव, डॉ. ए. डी. जाधव, डॉ. मेघा पानसरे, डॉ. के. के. शर्मा, डॉ. व्ही. वाय. धुपदाळे आदी उपस्थित होते.

# ‘माजी सेवक शिवाजी विद्यापीठाचे आधारस्तंभ’

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील संशोधक संशोधनाचे काम करीत असले तरी माजी सर्व सेवक विद्यापीठाचे आधार स्तंभ आहेत, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

विद्यापीठ सेवक संघातर्फे व्ही. आर. पाटील यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून आयोजित सेवानिवृत्त सेवकांच्या स्नेह मेळाव्यात ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, विद्यार्थी दशेपासून ते आजपर्यंत विद्यापीठातील प्रशासकीय सेवकांनी केलेले काम जवळून पहिले असून त्यांच्या कामाचे कौतुक आहे. सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत म्हणाले, सेवक संघ व विद्यापीठ यांचे अतूट नाते आहे. विद्यापीठाची प्रगती, महाराष्ट्रात विद्यापीठ प्रशासनाचा दबदबा यात सेवक संघाचे योगदान आहे. दरम्यान, सकाळी सेवक संघाच्या कार्यालयात व्ही. आर. पाटील यांच्या प्रतिमेस कुलगुरू, प्र-कुलगुरू यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. त्यानंतर भावभक्ती गीतांच्या कार्यक्रम झाला. विष्णू खाडे, संभाजी जगदाळे, रमेश पवार, वर्षा पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.



संजय घोडावत विद्यापीठाच्या वतीने आयोजित दुसऱ्या पदवी दान समारंभात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व अध्यक्ष संजय घोडावत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले. यावेळी विनायक भोसले, डॉ. एम. टी. तेलसंग, डॉ. एन. के. पाटील, डॉ. श्रीनिवास बाळकुंडी उपस्थित होते.

# जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज व्हा

## डी. टी. शिर्के : संजय घोडावत विद्यापीठाचा पदवी दान सोहळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कौशल्य विकास हा शैक्षणिक क्षेत्रातील मूलभूत कणा आहे. विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा ध्यास घेऊन संशोधन प्रकल्पाद्वारे समाजोपयोगी संशोधन करावे व जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज व्हावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

संजय घोडावत विद्यापीठाच्या दुसऱ्या पदवी दान समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे अध्यक्ष संजय घोडावत होते. यावेळी विश्वस्त विनायक भोसले, कुलगुरू डॉ. एम. टी.तेलसंग, कुलसचिव डॉ. एन. के. पाटील, परीक्षा नियंत्रक डॉ. श्रीनिवास बाळकुंडी, श्री. पी. ए. देसाई, डॉ. यू. पी. जाधव, डॉ. ए. डी. सावंत, डॉ. आबिद सलाती, प्रा. संजयकुमार इंगळे, डॉ. वाय. एल. गिरी उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, संजय घोडावत विद्यापीठ आज आंतरराष्ट्रीय स्तरावर नावारूपास आलेले विद्यापीठ आहे. पूर व कोविड यांसारख्या कठीण काळात या विद्यापीठाने समाजहित जोपासून आपल्या सामाजिक कार्याचा संदेश दिला आहे. या विद्यापीठाने विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या दिग्गजांना एसजीयू आयकॉन पुरस्कार देऊन गौरविले आहे. येणाऱ्या काळात शिवाजी विद्यापीठाकडून लागेल ती मदत करू.

संजय घोडावत म्हणाले विद्यार्थ्यांना संकटांना सामोरे जाता आले पाहिजे. संधी व आव्हाने या गोष्टी यशाच्या राजमार्गातील कणा आहेत. विद्यार्थ्यांनी सकारात्मक अभिवृत्ती जपायला हवी तसेच आई-वडील व थोरा-मोठ्यांचा आदर करायला हवा, अभ्यासाबरोबर आरोग्याकडेही लक्ष द्यायला हवे. यशाला कोणताही शॉर्टकट नाही. कुलगुरू डॉ. एम. टी. तेलसंग यांनी प्रास्ताविकात विद्यापीठाचा वार्षिक अहवाल वाचून दाखविला. यावेळी विद्यार्थ्यांना पदवीप्रदान व विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांच्या सन्मान करण्यात आला. कुलसचिव डॉ. एन. के. पाटील यांनी आभार मानले.

# विद्यार्थ्यांनी आव्हानांना सामोरे जाण्यास सज्ज व्हावे

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : घोडावत विद्यापीठाचा पदवीदान समारंभ

**जयसिंगपूर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज व्हायला हवे. विद्यार्थ्यांकडे ज्ञानासोबत कौशल्यसुद्धा असणे गरजेचे आहे. कौशल्य विकास हा शैक्षणिक क्षेत्रातील मूलभूत कणा आहे. विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा ध्यास घेऊन संशोधन प्रकल्पाद्वारे समाजोपयोगी संशोधन करावे, तसेच नैतिकमूल्ये जोपासून चांगले नागरिक बनणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

येथील संजय घोडावत विद्यापीठाच्या दुसरा पदवीदान समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे अध्यक्ष संजय घोडावत होते.



**जयसिंगपूर : घोडावत विद्यापीठाच्या पदवीदान समारंभप्रसंगी संजय घोडावत, डॉ. डी. टी. शिर्के आदी.**

डॉ. शिर्के म्हणाले, घोडावत विद्यापीठ आंतरराष्ट्रीय स्तरावर नावारूपास आले आहे. पूर व कोविडसारख्या कठीण काळात या विद्यापीठाने समाजहित जोपासून आपल्या सामाजिक कार्याचा संदेश दिला आहे. या विद्यापीठाने विविध क्षेत्रात काम करणाऱ्या दिग्गजांना एसजीयू आयकॉन पुरस्कार देऊन गौरविले आहे. या सर्व गोष्टीसाठी एका उत्कृष्ट नेतृत्वाची गरज असते आणि ते नेतृत्व म्हणजे संजय घोडावत आहेत. येणाऱ्या काळात शिवाजी विद्यापीठाकडून लागेल ती मदत करू, असे आश्वासन दिले.

संजय घोडावत म्हणाले, विद्यार्थ्यांना आयुष्यात अनेक संकटे येतील, पण त्या संकटांना सामोरे जाता आले पाहिजे. संधी व आव्हाने या गोष्टी यशाच्या मार्गातील कणा आहे. विद्यार्थ्यांनी सकारात्मक अभिवृत्ती जपायला हवी.

डॉ. तेलसंग यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर केला. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. घोडावत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. उर्वरित विद्यार्थ्यांना ऑनलाईन पदवी प्रदान करण्यात आली.

विश्वस्त विनायक भोसले, संचालक डॉ. व्ही. व्ही. कुलकर्णी, परीक्षा नियंत्रक डॉ. श्रीनिवास बाळकुंडी, परीक्षा विभागाचे सहाय्यक रजिस्ट्रार प्रा. अरविंद कांबळे, प्रा. प्रीतम निकम, पी. ए. देसाई, डॉ. यू. पी. जाधव, डॉ. ए. डी. सावंत, डॉ. आबिद सलाती, प्रा. संजयकुमार इंगळे, डॉ. वाय. एल. गिरी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. स्नेहल शिंदे, डॉ. सुनंदा शिंदे यांनी केले. कुलसचिव डॉ. एन. के. पाटील यांनी आभार मानले.

# नेताजी सुभाषचंद्र बोस यांना अभिवादन

## जयंतीनिमित्त संस्था-संघटनांच्या वतीने प्रतिमा पूजनासह विविध कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र लढा देणाऱ्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांना त्यांच्या १२५ व्या जयंतीदिनी अभिवादन करण्यात आले. विविध संस्था-संघटनांच्या वतीने शनिवारी जयंती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

**शिवाजी विद्यापीठ**

शिवाजी विद्यापीठात नेताजी सुभाषचंद्र बोस यांना अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, पदार्थ विज्ञान अधिविभागाचे प्रमुख डॉ. के.वाय. राजपुरे, डॉ. पी. एन. वासंबेकरण आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात नेताजी सुभाषचंद्र बोस यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्ही.टी. पाटील, डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. के.वाय. राजपुरे आदी उपस्थित होते.**

**सायबर महाविद्यालय**

सायबर महाविद्यालयात विविध उपक्रमांद्वारे नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. देवदत्त माळी, रघुनाथ पाथरवट यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. दीपक भोसले यांनी केले. कार्यक्रमास प्रा. डी. एस. माळी, डॉ उमेश देशमुख आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. रसिया पाडळकर यांनी केले.

**भाजप जिल्हा कार्यालय**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांना भाजप जिल्हा कार्यालयात अभिवादन करण्यात आले. माजी खा. अमर साबळे व पश्चिम महाराष्ट्र प्रवक्ते धनंजय महाडिक यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश जाधव, भाजपचे जिल्हाध्यक्ष राहुल चिकोडे, दिलीप मेत्राणी, हेमंत आराध्ये, गणेश देसाई आदी उपस्थित होते.

**माझी शाळा**

कदमवाडी, भोसलेवाडी येथील माझी शाळा येथे नेताजी सुभाषचंद बोस यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी सुसंस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक एम. एच. मगदूम, सेवानिवृत्त पोलिस उपअधीक्षक बाळासाहेब गवाणी, मुख्याध्यापक विजय भोगम, मुख्याध्यापिका अरुणा हुल्ले आदी उपस्थित होते.

**दयावान ग्रुप, फुलेवाडी**

**फुलेवाडी :** येथील आझाद हिंद तरुण मंडळप्रणीत दयावान ग्रुपच्या वतीने नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी करण्यात आली. माजी नगरसेवक अजित ठाणेकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष प्रताप देसाई, श्रीकांत पाटील, मोहन जाधव, सुरेश निकम, सुदाम सरनाईक आदी उपस्थित हाते.

# मंत्री उदय सामंत यांच्या आज तीन ठिकाणी सभा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवसेना कोल्हापूर जिल्हा संपर्कमंत्री आणि राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत आज, सोमवारी कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या तीन ठिकाणी सभा होणार आहेत. शिवाजी पेठेतील गांधी मैदान येथील मल्टी स्पोर्ट्स टर्फ मैदानाचे सायंकाळी ६.३० वाजता त्यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांच्या विशेष प्रयत्नातून साकारलेल्या गांधी मैदान येथील टर्फ मैदानाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. रात्री ८ वाजता प्रभाग क्रमांक ३१ बाजार गेटअंतर्गत जोशी गल्ली चौक, शनिवार पेठ आणि जुना बुधवार तालीम येथे सभा होणार आहेत. यावेळी खासदार संजय मंडलिक, शिवसेना शहरप्रमुख रविकिरण इंगवले, आदींची उपस्थिती राहणार आहे.

# उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत आज जिल्हा दौऱ्यावर



कोल्हापूर : राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत सोमवारी (दि. २५) जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत. सकाळी नऊ वाजता ते शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या भेटी घेणार आहेत. दहा वाजता नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात यांच्या निवासस्थानी भेट देणार आहेत. यानंतर सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठात 'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ कोल्हापूर' या उपक्रमाचा प्रारंभ त्यांच्या हस्ते होणार आहे. सायंकाळी ६ वाजता आजी माजी विद्यार्थी कृती समितीच्या विद्यार्थी सहाय्यता केंद्रांचे सायबर चौकात उद्घाटन होईल. साडेसहा वाजता गांधी मैदान येथील टर्फ मैदानाचे उद्घाटन होणार आहे. माजी महापौर सरिता मोरे, माजी नगरसेवक नंदकुमार मोरे सामंत यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. हा कार्यक्रम सात वाजता जुना बुधवार पेठ येथे होणार आहे. रात्री आठ वाजता जोशी गल्ली येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री उशिरा ते सिंधुदुर्गला रवाना होणार आहेत.

# मंत्री उदय सामंत आज कोल्हापूर दौऱ्यावर

**कोल्हापूर :** उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत आज (दि. २५) रोजी कोल्हापूर दौऱ्यावर येणार आहेत. सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठात 'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय आपल्या विभागात' या अभिनव उपक्रमाला सुरुवात होणार आहे. प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थ्यांनी समस्या मांडण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन मंत्री उदय सामंत यांनी केले आहे.



उच्च व तंत्र शिक्षण मंत्री सामंत शासकीय विश्रामगृह येथे सकाळी ९ वाजता पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेणार आहेत. सकाळी १० वाजता खासदार धैर्यशील माने यांच्या समवेत नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात यांच्या ताराबाई पार्कातील निवास्थानी भेट. सकाळी ११ वाजता विद्यापीठातील दीक्षांत हॉलमध्ये 'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय आपल्या दारी' उपक्रमाला उपस्थिती.

यानंतर सायंकाळी ५ वाजता शिवाजी विद्यापीठात पत्रकार परिषद. सायंकाळी ६ वाजता सायबर चौकातील आजी-माजी विद्यार्थी कृती समिती संचलित विद्यार्थी सहाय्यता केंद्राचे उद्‍घाटन. सायंकाळी ६.३० वाजता गांधी मैदान येथील फुटबॉल टर्फ मैदानाचे शिक्षणमंत्र्यांच्या हस्ते उद्‍घाटन. सायंकाळी ७ वाजता जुना बुधवार पेठ येथे शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत माजी महापौर सरिता मोरे व माजी स्थायी समिती सभापती नंदकुमार मोरे यांचा शिवसेना पक्ष प्रवेश. रात्री ८ वाजता शनिवार पेठ येथील जोशी गल्ली कॉर्नर येथे शिवसेनेच्या वतीने आयोजित जाहीर सभेला उपस्थिती असा त्यांचा दौरा आहे. यानंतर रात्री उशिरा ते सिंधुदुर्गला रवाना होणार आहेत.

# तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत आज दौऱ्यावर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवसेना कोल्हापूर जिल्हा संपर्कमंत्री आणि राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत सोमवारी (दि. २५) कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. मनपा निवडणुकीच्या दृष्टीने ते दौऱ्यावर येत असून, त्यांच्या या दौऱ्यादरम्यान शहरात शिवसेनेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याची माहिती माजी आमदार राजेश क्षीरसागर यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.



माजी आमदार क्षीरसागर यांच्या प्रयत्नातून साकारलेल्या गांधी मैदान येथील मल्टी स्पोर्टस् टर्फचे उद्घाटन सायंकाळी मंत्री सामंत यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी जिल्हा सहसंपर्कप्रमुख खा. संजय मंडलिक, शहरप्रमुख रविकिरण इंगवले, नगरसेविका तेजस्विनी इंगवले आदी उपस्थित राहणार आहेत. यानंतर सायंकाळी सात वाजता प्रभाग क्र. २९ शिपुगडे तालीम अंतर्गत हळदकर हॉल, जुना बुधवार पेठ येथे जाहीर सभा होणार आहे. सभेत नंदकुमार मोरे आणि सरिता मोरे या शिवसेनेत जाहीर प्रवेश करणार आहेत. यासह उत्तरेश्वर पेठ येथील सामाजिक कार्यकर्ते रियाज बागवान यांचा सत्कार तसेच रात्री ८ वाजता जोशी गल्ली चौक, शनिवार पेठ येथे जाहीर सभा होणार आहे.

# उच्च व तंत्र शिक्षणमंत्री सामंत आज कोल्हापूर दौऱ्यावर

कोल्हापूर, ता. २४ : महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्र शिक्षणमंत्री तसेच शिवसेनेचे संपर्कप्रमूख उद्या (ता. २५) कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. माजी महापौर सरिता मोरे त्यांचे पती माजी नगरसेवक नंदकुमार मोरे शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. शिपुगडे तालीम व बाजारगेट येथे सामंत यांची जाहीर सभा होणार आहे.

दुपारी बारा वाजता शिवाजी विद्यापीठ येथे सामंत यांच्या उपस्थितीत 'शिक्षण विभाग आपल्या दारी' या उपक्रमास सुरवात होणार आहे. सायंकाळी सहा वाजता गांधी मैदान येथे मल्टी स्पोर्टसचे टर्फचे सामंत यांच्या हस्ते उदघाटन होईल. सायंकाळी सात वाजता शिपगुडे तालीम येथे त्यांची जाहीर सभा होईल. मोरे दांपत्य या सभेत शिवसेनेत प्रवेश करतील.



उदय सामंत

बाजारगेट जोशी गल्ली येथे रात्री आठ वाजता सभा होईल. शिव अल्पसंख्याक जिल्हा समन्वयकपदी निवड झाल्याबद्दल रियाज बागवान यांचा सामंत यांच्या हस्ते सत्कार होईल. महापालिका निवडणूक महाविकास आघाडी म्हणून एकत्रित लढायचे की काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना याचा निर्णय झालेला नाही. त्या पार्श्वभूमीवर सामंत यांच्या दौऱ्याला महत्व प्राप्त झाले आहे.

# शिक्षण आपल्या दारी उपक्रमातच तक्रारी सोडवा

## आमदार प्रकाश आबिटकर यांची शिवाजी विद्यापीठ प्रशासनाला सूचना

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिक्षण विभाग आपल्या दारी' या उपक्रमात विविध स्वरुपाच्या तक्रारी येतील. यांतील बहुतांश तक्रारी याच उपक्रमात सोडवल्या पाहिजेत. उपक्रम यशस्वी करण्यासाठी समस्या एकूण या समस्यां तेथेच सोडवा, अशी सूचना आमदार प्रकाश आबिटकर यांनी केल्या. सोमवारी होणाऱ्या शिक्षण विभाग आपल्या दायी या उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आढावा बैठक घेतली.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांच्यासमोर आमदार आबिटकर यांनी शिक्षण सहसंचालक कार्यालयातील गोंधळ सांगितला. मंत्री सामंत यांनी शिक्षण विभागाची घेतलेल्या बैठकीत आबिटकर यांनी शिक्षण विभाग आपल्या दारी या उपक्रमाची संकल्पना मांडली. त्यानुसार सोमवार २५ जानेवारी रोजी विद्यापीठात हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी उपक्रमाबद्दल माहिती दिली. आबिटकर म्हणाले, बैठकीची तयारी चांगली आहे, परंतू तक्रारदाराच्या तक्रारींचे निरर्सन होईल, तेंव्हाच हा उपक्रम यशस्वी होईल. शिक्षण सहसंचालक कार्यालयातील तक्रारीबाबत एक स्वतंत्र सत्र ठेवण्याच्या सूचना दिल्या. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

**विद्यापीठाची जंगी तयारी**

शिक्षण विभाग आपल्या दारी' या उपक्रमाची विद्यापीठाने जंगी तयारी केली आहे. राजमाता जिजाऊ सभागृहात हा उपक्रम होणार आहे. येथे तक्रारदारांना बसण्याची सुविधा आहे. कोरोना पार्श्वभूमीवर निर्जंतुकीकरण, सोशल डिस्टन्सिंग याचीही काळजी घेण्यात आली आहे. ज्यांनी ऑनलाईन तक्रार दिल्या आहेत त्यांच्या तक्रारींचे निरसन केले जाणार आहे.

# उच्च, तंत्र शिक्षण मंत्रालय आज कोल्हापूरच्या दारी

## ९०० तक्रारींचा निपटारा करणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातून राज्यव्यापी 'उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ कोल्हापूर' या उपक्रमाची सुरुवात सोमवारी (दि. २५) होणार आहे. विद्यापीठ प्रशासनाकडून आवश्यक ती सर्व तयारी पूर्ण झाली आहे. उपक्रमासाठी ९०० ऑनलाईन निवेदने आली आहेत. या तक्रारींचा निपटारा तत्काळ या उपक्रमात करण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहात सकाळी ११ वाजता मंत्री सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांसह राज्य सामाईक प्रवेश परीक्षा **पान २ वर**

# उच्च, तंत्रशिक्षण मंत्रालय आज कोल्हापूरच्या दारी

कक्षाचे आयुक्त, तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक, उच्च शिक्षण संचालक, कला संचालनालयाचे संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे संचालक, ग्रंथालय संचालनालयाचे संचालक, सहसंचालक व उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सर्व उच्चपदस्थ अधिकारी व कर्मचारी सहभागी होणार आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासन, यूजीसीच्या निर्देशाचे पालन करीत नियोजन करण्यात आले आहे. दरम्यान, रविवारी सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विला नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील यांनी राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहास भेट देऊन तयारीची पाहणी करून आढावा घेतला. संबंधितांना आवश्यक त्या सूचना केल्या.

# 'उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय @ कोल्हापूर' आज

## उदय सामंत जाणून घेणार प्रश्न

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांच्या संकल्पनेतून आज, सोमवारी (दि.२५) शिवाजी विद्यापीठात 'उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय @ कोल्हापूर' हा उपक्रम होणार आहे. त्यामध्ये मंत्री सामंत विद्यार्थ्यांसह उच्चशिक्षण क्षेत्राशी संबंधित विविध घटकांचे प्रश्न, अडचणी समजून घेणार आहेत.

विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यापीठीय कर्मचारी, शैक्षणिक संस्थांचे विविधस्तरावरील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी मंत्री सामंत यांनी 'उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय आपल्या विभागात' हा अभिनव उपक्रम घोषित केला. त्यांची सुरुवात विद्यापीठात 'उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय @ कोल्हापूर'ने होणार आहे. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये सकाळी ११ ते सायंकाळी ५ यावेळेत होणाऱ्या उपक्रमास उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त, तंत्रशिक्षण संचालनालय, उच्चशिक्षण, कला संचालनालय, तंत्रशिक्षण मंडळ, ग्रंथालय संचालनालयाचे संचालक आदी उपस्थित असतील. दरम्यान, कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील यांनी या उपक्रमाच्या तयारीची रविवारी पाहणी केली.

### ९०० ऑनलाइन निवेदने सादर

या उपक्रमामध्ये सहभागी होणाऱ्या घटकांना निवेदने सादर करण्यासाठी विद्यापीठाने ऑनलाइन पोर्टल निर्माण केले आहे. या पोर्टलवर सायंकाळपर्यंत सुमारे ९०० व्यक्ती, संस्थांनी ऑनलाइन निवेदने सादर केली आहेत. त्यात आश्वासित प्रगती योजना, कॅस पदोन्नती, पदभरतीबाबतच्या निवेदनांची संख्या अधिक आहे.